RNI No. MAHBIL/2012/47985
www.dgps.maharashtra.gov.in

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# भाग एक-अ-पुणे विभागीय पुरवणी

वर्ष - १३, अंक - ११ ] गुरुवार ते बुधवार, सप्टेंबर २६ ते ऑक्टोबर २, २०२४ / आश्विन ४ - १०, शके १९४६ [ पृष्ठे ०३

## प्राधिकृत प्रकाशन

### जिल्हाधिकारी यांजकडून

### आदेश

क्रमांक नवि/निवडणूक/आरआर-३०३/२०२४.—महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या करण्याची पद्धत) नियम, २०१० नियम ६ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारानुसार मी, डॉ. राजा दयानिधी, जिल्हाधिकारी, सांगली या प्रकटनाद्वारे असे जाहीर करतो की, खानापूर नगर पंचायतीच्या दिनांक ९ सप्टेंबर २०२४ रोजी घेणेत आलेल्या विशेष सभेमध्ये खालील उमेदवार त्यांचे नावासमोर नमूद केलेल्या नगर पंचायतीचे नामनिर्देशित सदस्य म्हणून नियुक्त झालेले आहेत.

### परिशिष्ट

| अ.नं. | नगर पंचायतीचे नाव | नामनिर्देशित सदस्याचे नाव |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १. | खानापूर नगर पंचायत, खानापूर | गिड्डे बद्रिनाथ शिवाजी |

**डॉ. राजा दयानिधी** (भा.प्र.से.),
जिल्हाधिकारी, सांगली.

सांगली, १० सप्टेंबर २०२४.

### BY COLLECTOR

### ORDER

No. NP/Election/RR-303/2024.– The provisions contained in Rule 6 of the Maharashtra Municipal Councils and Nagar Panchayats (Qualification and Procedure for Appointment of Nominated Councillors) Rules 2010, I. Dr. Raja Dayanidhi, Collector of Sangli, hereby publish name of the Candidate Nominated as Nominated Councillor in special meeting conducted by Khanapur Nagar Panchayat on 9th September 2024.

### Schedule

| Sr. No. | Name of Nagar Panchayat | Nominated Councillor Name |
|---|---|---|
| 1 | 2 | 3 |
| 1. | Khanapur Nagar Panchayat, Khanapur | Gidde Badrinath Shivaji |

**DR. RAJA DAYANIDHI** (I.A.S.),
Collector, Sangli.

Sangli, 10th September 2024.

## महानगर आयुक्त यांजकडून

## पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे

*महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ मधील कलम ५३ (८) नुसार पदनिर्देशित अधिकारी घोषित करणेबाबत*

## अधिसूचना

क्रमांक पु.म.प्र.वि.प्रा./अ.बां.नि.वि./१८१५/२०२४.—ज्याअर्थी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ मधील कलम ५३ *(८)* अन्वये "नियोजन प्राधिकरण, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, या कलमान्वये आणि कलमे ५४, ५५ व ५६ अन्वये, नियोजन प्राधिकरणाच्या अधिकारांचा वापर करण्याच्या प्रयोजनांसाठी पदनिर्देशित अधिकारी म्हणून, नियोजन प्राधिकरणाच्या एखाद्या अधिकाऱ्यास पदनिर्देशित करील. पदनिर्देशित अधिकाऱ्यास, अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अशा स्थानिक क्षेत्रावर अधिकारिता असेल आणि वेगवेगळ्या स्थानिक क्षेत्रांसाठी वेगवेगळे पदनिर्देशित अधिकारी पदनिर्देशित करता येतील." अशी तरतूद आहे.

त्याअर्थी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ मधील कलम ५३ *(८)* नुसार अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभाग, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण येथे कार्यरत तहसीलदार यांना पदनिर्देशित अधिकारी व संबंधित कनिष्ठ अभियंता यांना सहायक पदनिर्देशित अधिकारी म्हणून घोषित करीत आहे.

ज्याअर्थी कामकाजाचे सोईसाठी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्राचे पश्चिम व पूर्व असे विभाग करणेचा निर्णय घेतलेला आहे. त्याअर्थी पदनिर्देशित अधिकारी म्हणून तहसीलदार (पश्चिम) व तहसीलदार (पूर्व) व सहायक पदनिर्देशित अधिकारी म्हणून संबंधित कनिष्ठ अभियंता यांचेकडे कार्यभार सोपविण्यात येत आहे व त्याचा तपशील खालील तक्त्यामध्ये नमूद केलेला आहे.

| अ.क्र | पदनिर्देशित अधिकारी | सहा. पदनिर्देशित अधिकारी | स्थानिक क्षेत्र |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १. | तहसीलदार पश्चिम | कनिष्ठ अभियंता (मावळ) | तालुका मावळ |
| | | कनिष्ठ अभियंता (मुळशी उत्तर) | तालुका मुळशी उत्तर |
| | | कनिष्ठ अभियंता (मुळशी दक्षिण) | तालुका मुळशी दक्षिण |
| | | कनिष्ठ अभियंता (हवेली पश्चिम) | तालुका हवेली पश्चिम |
| | | कनिष्ठ अभियंता (वेल्हा) | तालुका वेल्हा |
| २. | तहसीलदार पूर्व | कनिष्ठ अभियंता (खेड) | तालुका खेड |
| | | कनिष्ठ अभियंता (शिरूर) | तालुका शिरूर |
| | | कनिष्ठ अभियंता (भोर) | तालुका भोर |
| | | कनिष्ठ अभियंता (हवेली पूर्व) | तालुका हवेली पूर्व |
| | | कनिष्ठ अभियंता (दौंड) | तालुका दौंड |
| | | कनिष्ठ अभियंता (पुरंदर) | तालुका पुरंदर |
| | | कनिष्ठ अभियंता (PCNTDA) | PCNTDA क्षेत्र |

त्याअर्थी उक्त महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ मधील कलम ५३ *(८)* अन्वये प्राप्त अधिकारानुसार सदर अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध करणेसाठी प्रस्तावित करणेत येत आहे. सदर अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून अमलात येईल.

**डॉ. योगेश म्हसे** (भा.प्र.से.),
महानगर आयुक्त,
पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे.

पुणे, १८ सप्टेंबर २०२४.

## BY METROPOLITAN COMMISSIONER

### PUNE METROPOLITAN REGION DEVELOPMENT AUTHORITY, PUNE

*Appointment of Designated Officers under Section 53 (8) of the Maharashtra Regional Planning and Town Planning Act, 1966.*

### NOTIFICATION

क्रमांक पु.म.प्र.वि.प्रा./अ.बां.नि.वि./१८१५/२०२४.– Provided that provision under Section 53 *(8)* of the Maharashtra Regional Planning and Town Planning Act, 1966 is "The Planning Authority shall, by Notification in the Gazette, Designate an Officer of the Planning Authority as the Designated Officer for the purposes of exercising the powers of the Planning Authority under this section and under Sections 54, 55 and 56, the Designated Officer shall have Jurisdiction over such local area as may be specified in the Notification and different Designated Officers may be appointed for different local areas."

Accordingly, under Section 53 *(8)* of the Maharashtra Regional Planning and Town Planning Act, 1966, Tahsildars appointed in Illegal Constructions Demolition Department of Pune Metropolitan Region Development Authority are being declared as Designated Officers and concerned Junior Engineers as Assistant Designated Officers.

and whereas, for the convenience of work, it has been decided to divide the jurisdiction of Pune Metropolitan Region Development Authority into West and East region. Accordingly, Tahsildar (West) and Tahsildar (East) of Iiegal Constructions Demolition Department, Pune Metropolitan Region Development Authority are declared as Designated Officers and concerned Junior Engineers as Assistant Designated Officers. They are entrusted with the duties and the details of Jurisdiction is mentioned in the table below.

| Sr. No. | Designated Officer | Ass. Designated Officer | Local Area |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| | Tahsildar (West) | Junior Engineer (Maval) | Taluka Maval |
| | | Junior Engineer (Mulshi North) | Taluka Mulshi North |
| | | Junior Engineer (Mulshi South) | Taluka Mulshi South |
| | | Junior Engineer (Haveli West) | Taluka Haveli West |
| | | Junior Engineer (Velhe) | Taluka Velhe |
| 2. | Tahsildar (East) | Junior Engineer (Khed) | Taluka Khed |
| | | Junior Engineer (Shirur) | Taluka Shirur |
| | | Junior Engineer (Bhor) | Taluka Bhor |
| | | Junior Engineer (Havel East) | Taluka Havel East |
| | | Junior Engineer (Daund) | Taluka Daund |
| | | Junior Engineer (Purandar) | Taluka Purandar |
| | | Junior Engineer (PCNTDA) | PCNTDA Area |

Accordingly, the said notification is being proposed to be published in the Maharashtra Gazette as per the authority conferred under Section 53 *(8)* of the said Maharashtra Regional Planning and Town Planning Act, 1966. The said notification will come into effect from the date of publication in the Government of Maharashtra Gazette.

**DR. YOGESH MHASE** (I.A.S.)
Metropolitan Commissioner,
Pune Metropolitan Region Development Authority, Pune.

Pune, 18th September 2024.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT YERAWADA PRISON PRESS, PRISON COMPOUND, YERAWADA, PUNE-411 006 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI – 400 004.

EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.